


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६७८. वा | शुक्रवार | दि. ०९ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# उपनिबंधकांच्या कारवाईचा बुलडोजर अन् अवैध सावकारांची धावाधाव...

# बुलढाण्यातही अकोल्याच्या धर्तीवर कारवाईची गरज

**जनसंचलन/ बुलढाणा**

अकोल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा उपनिबंधकांनी बुधवार दि. ७ फेब्रुवारी २०२४ रोजी अकोला शहरात अवैध सावकारांवर धाडसत्र राबवले अन् शहरात सुळसुळाट झालेल्या अवैध सावकारांचे चांगलेच धाबे दणाणले. विविध ठिकाणी जिल्हा उपनिबंधकांच्या अधिकाऱ्यांच्या टीमने टाकलेल्या छाप्यात मोठ्या प्रमाणात कागदपत्रे, करारनामे, डायऱ्या, रद्द केलेले धनादेश, कोरे लेटर हेड, उसनवार पावत्या, लायकी दाखले जप्त करण्यात आले आहेत. दरम्यान, या कारवाईमुळे अवैध सावकारांना चांगलाच घाम फुटला असून, बऱ्याच सावकारांची तर पळता भुई थोडी अशी स्थिती झाली होती. अकोला येथे झालेल्या या कारवाई प्रमाणेच बुलढाणा जिल्ह्यातील अवैध सावकारांवरही कारवाई होणे गरजेचे असल्याचे सर्वासमान्यांमध्ये बोलले जात आहे. अकोल्यामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून हे अवैध सावकारांचे जाळे विणल्या गेलेले आहे. या अवैध सावकारांच्या माध्यमातून शेतकऱ्यांची अनेकदा लूट होते. विदर्भात ही समस्या अनेक वर्षांपासून होती, त्यामुळे विदर्भात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्याही होत होत्या. हीच बाब हेरून राज्याचे तत्कालीन गृहमंत्री दिवंगत आर. आर. पाटील यांनी त्या वेळी या अवैध सावकारांना कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढा असे स्पष्ट आदेशच दिले होते. त्या वेळी अनेकदा सावकारांवर कारवायादेखील झाल्या होत्या. त्यानंतर अकोल्याचे माजी आमदार गुलाबराव गावंडे यांनीही सावकार बजाव ही मोहीम सुरू केली होती. हे सर्व काही होत असतानाही अवैध सावकारी मात्र थांबायचे नाव घेत नाही. काही महिन्यांपूर्वी जेंव्हा सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनकडे अकोला येथील उद्योजक अवैध





हेच ते अवैध सावकाराच्या घरात सापडलेले स्टॅम्प पेपर आणि दस्तावेज

सावकार मनोहर कृपलानी याच्याविरोधात तक्रार प्राप्त झाली. त्यानंतर दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने याविषयाची पडताळणी केली असता, स्पष्टपणे आढळून आले होते की, मनोहर कृपलानी व त्यांचा मुलगा अवैध सावकारी करतात. ज्यांना-ज्यांना त्यांनी व्याजाने पैसे दिलेले आहेत, त्यांच्याकडून अत्यंत निर्दयीपणे पठाणी वसुली करणे, अव्वाच्या सव्वा व्याज वसूल करणे, कर्जदार पैसे देऊ शकला नाही, तर त्याची संपत्ती आपल्या नावावर बळजबरी करून घेणे, असे प्रकार करीत आहेत. याविरोधात सिटी म्युज व दैनिक जनसंचलनने वृत्तमालिका प्रकाशित केली. त्यात कृपलानी यांचे सगळे प्रताप उघड केले होते. तसेच अकोला जिल्हा उपनिबंधकांकडेही यासंदर्भात तक्रार केली होती. त्या वेळी तत्कालीन जिल्हा उपनिबंधकांनी यासंदर्भात कोणतीही कारवाई केली नव्हती.मनोहर अडीटमल कृपलानी याने बुलढाणा जिल्ह्यातही अनेकांना व्याजाने पैसे दिल्याचे व त्यांच्याकडून अव्वाच्या सव्वा व्याज वसूल केल्याची माहिती आहे.

याशिवाय बुलढाणा जिल्ह्यातही अवैध सावकारी मोठ्या प्रमाणात आहे. परंतु बुलढाणा जिल्हा उपनिबंधक अकोल्याच्या जिल्हा उपनिबंधकांसारखी सक्रियता दाखवत नसल्याने अनेक प्रकरणे दडपली जातात. बऱ्याच वर्षांपूर्वी जिल्ह्यातही अवैध सावकारांच्या विरोधात कारवाया झाल्या होत्या. परंतु गेल्या दोन-चार वर्षांत यासंदर्भात फार कारवाया झाल्याचे ऐकिवात नाही. कारवाई होत नाही याचा अर्थ असे प्रकार होत नाहीत, असे नाही. त्यामुळे या माध्यमातून दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना आवाहन करीत आहे की, जर कुणाही अवैध सावकाराकडून आपले शोषण होत असेल, अव्वाच्या सव्वा व्याज वसूल केले जात असेल, बळजबरीने जमिनी,घरे हिसकावल्या जात असतील, तर तात्काळ सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनशी संपर्क साधावा. यासंदर्भात तीव्रतेने लढा लढला जाईल. ज्याप्रमाणे अकोल्यात कारवाया झाल्या, त्याच धरतीवर बुलढाण्यातही कारवाया

**सावकारी पीडितांना न्याय मिळून द्यावा व दोषींवर कडक कारवाई व्हावी या करीता आम्ही त्रस्त पीडितांच्या सोबत आहोत जो पर्यंत त्यांना न्याय मिळून देत नाही आमचा हा लढा त्यांच्या साठी असाच सुरू राहणार**

करण्यासाठी प्रशासनाला बाध्य केले जाईल. एकीकडे अवैध सावकारांचा त्रास असताना दुसरीकडे काही बँका या अवैध सावकारीचे प्रकार करीत आहेत. त्यापैकीच एक असलेल्या अमरावती येथील जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँकेचे विद्यमान अध्यक्ष अविनाश अंबादास कोठाळे हे देखील आहेत. तेही बऱ्याच कर्जदारांकडून असेच अव्वाच्या सव्वा व्याज वसूल करतात, पठाणी पद्धतीने वसुली करतात, कर्जदारांची संपत्ती अवैध मार्गाने जप्त करतात, प्रसंगी घरांवर दरोडे देखील टाकण्याचे काम करतात. अशांच्याविरोधातही कारवाई होणे गरजेचे आहे. यासंदर्भातही आगामी काळात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सक्रियपणे प्रयत्न करेल व पीडितांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करेल, यात शंका नाही.

अजून बरेच काही पुढील भागात...

# जिल्ह्यातील धक्कादायक घटना बस आणि ट्रकचा भीषण अपघात...

**जनसंचलन/बुलडाणा**

चिखली तालुक्यातील एका काळजाचा थरकाप उडवणारी घटना आज सकाळी घडली आहे. चिखली ते मेरा खु दरम्यान असलेल्या रामनगर फाट्याजवळ एसटी बस आणि ट्रकचा भीषण अपघात झाला. ट्रॅव्हलला औव्हरटेक करण्याच्या नादात महाराष्ट्र परिवहन महामंडळाची शयनयान बस ट्रॅव्हल समोर असलेल्या ट्रकला मागून धडकली. या अपघातात एसटी बस चालकाचे पाय मोडले असून एका २५ वर्षीय प्रवाशाचा जागीच मृत्यू झाला तर १५ ते १६ जण जखमी आहेत. हि घटना ९ फेब्रुवारीच्या पहाटे ५ वाजेच्या सुमारास हा अपघात झाला.एम एच १४ एल.बी.०५४४ क्रमांकाची महाराष्ट्र परिवहन महामंडळाची दोन महिन्यांपूर्वी नव्याने सुरू झालेली पुणे ते शेगाव ही शयनयान बस पुण्यावरून शेगावला येत होती. रामनगर फाट्याजवळ खाजगी ट्रॅव्हल ला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्न करित असताना ट्रॅव्हलसमोर आलेला मालवाहू ट्रक अचानक लेन बदलून एसटी बसच्या समोर आला. एसटी बस ओव्हरटेक करीत असल्याने वेगात होती. ती साखरेची वाहतूक करीत असलेल्या ट्रकला मागील बाजूस धडकली.या भीषण अपघात बसच्या समोरील भागाचे मोठे नुकसान झाले बस चालकाचे दोन्ही पाय मोडल्याचे सांगण्यात येत आहे.एक प्रवाशी





जागीच ठार झाला असून तो खामगाव तालुक्यातील रहिवाशी आहे. १५ ते१७ प्रवाशी जखमी झाली असून सर्वांना पुढील उपचारासाठी रूग्णालयत हलविण्यात आले आहे.

# चिंता करोगे तो मिलेगी बिमारी, चिंतन करोगे तो मिलेंगे बिहारी- सुश्री.प्रियंकाजी

**जनसंचलन/बुलढाणा**

श्रीमद् भागवत महापुराण ग्रंथामध्ये प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण विराजमान आहे, कथा श्रवण केल्यामुळे अंतःकरण शुद्ध होते., जोपर्यंत सृष्टी राहिलं तो पर्यंत राम नाम सत्यच राहील. भागवत कथेमुळे मृतप्रायः झालेल्या जीवात ज्ञान,भक्ती, वैराग्य,यांचा संचार होते. कथेमुळे दुःख नष्ट होत नाही पण दुःख सहन करण्याची क्षमता वाढते.चिंता कमी होते व चिंतन वाढते, चिंता करोगे तो मिलेंगे बिमारी, चिंतन करोगे तो मिलेंगे बिहारी. उद्गार सुश्री प्रियंकाजी यांनी भागवत कथेचे प्रथम पुष्प गुंफतांना व भागवत कथेचे महात्म्य विशद करतांना काढले. सुश्री प्रियंकाजी यांचे मंडपात आगमन भागवत महापुराण ग्रंथ सद्भावना सेवा समितीचे अध्यक्ष राधेशाम चांडक यांना दिला व व्यासपीठावर नेला. जांगीड समाज महिला मंडळाच्या सर्व महिला सदस्यांनी फुलांच्या पाकळ्या आंथरून व फुलांच्या वर्षावात देवीजी व भाईजाना व्यासपीठापर्यंत नेले .डॉ. के. बी. शर्मा,मुख्य यजमान, शिशुपाल कुमावत , दैनिक यजमान व उत्सव यजमान जयशंकर जयस्वाल यांनी ग्रंथाचे पूजन केले. राधेशाम चांडक, राजेश कोठारी,रवी राठी मूर्तिजापूर, यांनी देवींजीचे पुष्पहाराने स्वागत केले. विजय शर्मा, माया शर्मा, हंसा शर्मा,जगदीश शर्मा, सौ.बिमला कुमावत, सौ. निलिमा जैस्वाल,यांनी सर्व यजमानांसह स्टेजवर आरती केली. आजच्या दिवसाची संपूर्ण जबाबदारी जांगीड समाज महिला मंडळाने पार पाडली.स्व.सुर्यकुमार माधवाणी, स्व.कांताबाई



राधेश्याम अग्रवाल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या परिवाराने नऊ दिवसाचा प्रसाद देण्याचे घोषित केले.सौ. चंदादेवी राधेशाम धनेखा यांच्या सौजन्याने भागवत-कथेकरीता सुंदर व्यासपीठ प्राप्त झाले. सुश्री प्रियंकाजी यांचे स्वागत, आरतीची तयारी, सजावट करण्यासाठी रिना शर्मा, हंसा शर्मा, रूपा शर्मा, किरण शर्मा, माया शर्मा मंजू शर्मा, आरती शर्मा, जमुना शर्मा, सौ मुक्ता पाटील यांनी सहाय्य केले व अकरा हजार रुपयाची देणगी जाहिर केले. आज सादर केलेल्या झाकीमध्ये श्रीकृष्णाच्या वेशात सौं: ईशा संजयजी जांगीड, आणि राधाच्या वेशात रुतिका प्रेमप्रकाश शर्मा होते. वृंदावन वरुन आलेल्या झांकी वाल्यांनी राधा कृष्ण चा वेश धारण करून सुंदर नृत्य केले .मंडपात सर्व श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. सुश्री देवी प्रियंकाजी यांनी गोकर्णची कथा, घुटुंकारीची कथा या



सारखे अनेक दृष्टांत देऊन. सर्व श्रोत्यांना आनंदाच्या लाटेवर पोहोण्यास भाग पाडले. भागवत कथा प्रेतयोनीतून मुक्त करते. असेही स्पष्ट केले. सर्व राजमानासह डॉ. पवन बजाज, अनुप अग्रवाल, अशोक चांडक, कृष्णा चांडक, दत्तात्रय जाधव, डॉ प्रदीप जावंधिया, आनंद नाईक, तुषार भट्टड, रविकीरण राठी, प्रविणकुमार अग्रवाल, राजेश कोठारी, रवी राठी यांनी आरती केली. समितीच्या कार्यकर्त्यांनी व पदाधिकायांनी कथा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. बुलडाणा अर्बनचे अनंत बरडे, शंकर कुसळकर, एल आय सी ऑफीसर राजेश गावली यांनी समीतीचे कार्यालय सांभाळले सहकार विद्या मंदीरचे केतन देशमुख व संजय काळे यांनी सुरक्षितता सांभाळली. कथेला श्रोत्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

# विभागीय क्रीडा स्पर्धेत देवानंद ताठे अव्वल

**जनसंचलन/बुलडाणा**

**मागील वर्षीही केली दमदार कामगिरी बुलढाणा येथील सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यरत देवानंद ताठे यांनी मागील वर्षी पार पडलेल्या विभागीय क्रीडा स्पर्धे त देखील दमदार कामगिरी केली होती.**

नागपूर प्रादेशिक विद्युत मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग नागपूरव्दारा आयोजित विभागीय क्रिडा स्पर्धेत बुलढाणा येथील सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यरत देवानंद ताठे अव्वल ठरले आहेत. देवानंद ताठे यांनी या स्पर्धे दरम्यान १०० मीटर मॅरेथॉन मध्ये प्रथम, २०० मीटर मॅरेथॉन द्वितीय, पाच किलो मिटर मॅरेथॉनमध्ये तृतीय, गोळा फेकमध्ये तृतीय, व भालाफेकमध्ये तृतीय क्रमांक पटकावून विदर्भस्तरावर पाच मेडल प्राप्त केले. यावेळी नागपूर प्रादेशीक विद्युत मंडळ, सा.बां. विभागाचे अधीक्षक अभियंता हेमंत पाटील, कार्यकारी




अभियंता दारव्हेकर, कार्यकारी अभियंता मनीष पाटील यांच्या उपस्थितीत त्यांचा सत्कार करण्यात आला.

# माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रमात स्वच्छता मॉनिटर अभियान




**जनसंचलन/बुलडाणा**

रोहित आर्या यांच्या प्रोजेक्ट लेट्स चेंज स्वच्छता मॉनिटर अभियानाला वाढता प्रतिसाद आणि परिणाम दिसून येत आहे. त्यामुळे या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याला मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या स्पर्धात्मक उपक्रमात सर्वाधिक १० गुणांचे महत्त्व दिले आहे. अमरावती विभागाचे शिक्षण उपसंचालक शिवलिंग पटवे यांनी प्रोजेक्ट लेट्स चेंज स्वच्छता मॉनिटर अभियान व्यवस्थित समजून परिणामकारक राबवण्यासाठी कार्यशाळा, नियोजन केले आहे. या अभियानासाठी विभाग समन्वयक मंगेश भोरसे, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या मार्गदर्शनात शिक्षणाधिकारी बी. आर खरात, सिद्धेश्वर काळूसे, उपशिक्षणाधिकारी अनिल देवकर कार्यरत आहेत. शैक्षणिक वर्षाअखेर या अभियानात जिल्ह्यातील सुमारे १ हजार २००हून अधिक शाळांनी . संकेतस्थळावर सहभाग नोंदवला आहे. मागील प्रोजेक्ट लेट्स चेंज स्वच्छता मॉनिटर अभियानात जिल्ह्यातील २३ शाळांनी राज्यातील सर्वोत्तम शाळेचा मान पटकावला आहे. दुसऱ्या टप्प्यातही जिल्ह्यातील शाळा सहभागी आहेत. राज्यातून कचऱ्याबाबत होणाऱ्या निष्काळजीपणाची सवय कायमस्वरूपी मोडून काढण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व शाळांनी अभियानाचे स्वरूप समजून सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बलात्काराच्या खोटया आरोपातून आरोपीची निर्दोष मुक्तता



**जनसंचलन/बुलढाणा**

बलात्काराच्या खोटया आरोपातून आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. हकीकत अश्या प्रकारे आहे कि, दिनांक ०८/०३/२०२१ रोजी पोलीस स्टेशन, चिखली येथे फिर्याद दाखल केली होती कि, आरोपीने जबरदस्ती बलत्कार केला व त्यामधून दिवस गेले असून गर्भधारणा झाली आहे. अश्या खोटया आरोपांवरून आरोपी विरुद्ध भांदवी कलम ३७६(२),३७६(२)(१),३७६(२)(),३५४-ब,५०६ नुसार पोलीस स्टेशन चिखली येथे गुन्हा दाखल झाला होता. सदर प्रकरणामध्ये आरोपी विरुद्ध दोषारोप पत्र न्यायालयात दाखल झाल्या नंतर अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश,बुलडाणा यांच्या न्यायालयात सदर प्रकरण चालले फिर्यादी तसेच तपास अधिकारी व साक्षीदारांचे साक्ष पडताळणी झाली. आरोपी यांच्या वतीने अँड. श्रीवेद प्र. इंगळे यांचा युक्तिवाद योग्य मानून अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश मा.श्री. दीघे साहेब यांनी दिनांक ०२-०२-२०२४ रोजी आरोपी नामे प्रशांत बनसोड याला सदर प्रकारणामधून निर्दोष मुक्त केले. आरोपीच्या वतीने अँड. श्रीवेद प्र.इंगळे यांनी काम पाहिले त्यांना,अँड. नितीन जाधव व अँड. संकेत देशमुख यांनी सहकार्य केले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# रेती तस्करांना अभय देणाऱ्या सिंदखेडराजा तहसीलदार सचिन जयस्वाल यांची चौकशी करून कारवाई करा

## अ.भा.ग्रा.पत्रकार संघाची जिल्हाधिकाऱ्याकडे निवेदनाद्वारे मागणी

जनसंचलन/बुलढाणा

खडकपूर्णा नदीपात्रामधून काही महिने अधिकृत पासवर रेती विक्री सुरू होती .रात्रीच्या वेळेला मलकापूर पांगरा शेंदुर्जन साखरखेर्डा या भागामध्ये विना नंबर रेतीचे टिप्पर अवैधपणे चालू होते.चौफुलीवर अवैध रेती वाहतूक करणाऱ्या मार्फत एक हेर ठेवल्या जात होता तो हेर कोण आले कोण गेले यांचे संपूर्ण माहिती द्यायचा . विना नंबर चे टिप्पर मलकापूर पांगरा मधून भरधाव वेगाने जात असल्यामुळे अनेकदा अपघात होण्याचा धोका निर्माण झाला होता स्थानिक लोकांनी गोपनीय माहिती दिल्यामुळे मलकापूर पांगरा येथील दैनिक महाभुमी तसेच चौफेर बुलढाणा चे मुख्य संपादक गंगाराम उबाळे यांनी दिनांक २३ डिसेंबर रोजी गावातून अवैध रेती वाहतूक सुरू असल्याची माहिती सिंदखेड राजा तहसीलदार सचिन जयस्वाल यांना मोबाईल वरून दिली होती .परंतु याकडे तहसीलदार जैस्वाल यांनी कानाडोळा केला .त्यानंतर दिनांक २६ जानेवारी रोजी गंगाराम उबाळे यांनी दैनिकांमधून अवैध रेती वाहतूक असल्याची बातमी प्रकाशित केली .त्यानंतर दुसऱ्या दिवशीही अवैध रेती विना नंबरच्या टिप्पर सुरू असल्याची माहिती उबाळे यांनी तहसीलदार यांना दिले .परंतु सिनखेडराजा तहसीलदार सचिन जयस्वाल यांनी कुठलेही म्हणणे ऐकून न घेता पत्रकार गंगाराम उबाळे यांना दूरध्वनीवरून फोन करून उरमटपणाची भाषा वापरून तुम्ही पत्रकार लोक फालतुगिरी करता असे म्हटले . शिवाय तुम्हा पत्रकारांना कुठलेही काम धंदे नसून माझे काहीही वाकडे होत नाही असे म्हटले . त्यामुळे तहसीलदार सचिन जैस्वाल यांनी पत्रकार उबाळे यांच्याशी कोरमटपणाची भाषा वापरून एक प्रकारे पत्रकारांचा अपमान केला असून त्यांची चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी अखिल भारतीय ग्रामीण



पत्रकार संघाच्या वतीने जिल्हाधिकारी बुलढाणा यांना दिनांक ५ फेब्रुवारी रोजी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे या निवेदनावर ,अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रताप मोरे,जिल्हा उपाध्यक्ष अशोक इंगळे,जिल्हा प्रसिद्धी प्रमुख सचिन खंडारे,सिंदखेड राजा तालुका अध्यक्ष प्रल्हाद देशमुख,सिंदखेडराजा प्रसिद्धीप्रमुख गंगाराम उबाळे, जिल्हा उपाध्यक्ष बबन सरकटे, जिल्हा सचिव राजेंद्र मोरे,यांच्या सह्या आहेत, आता जिल्हाधिकारी यावर काय कारवाई करतात हे पाहणे महत्वाचे ठरेल.

# पाडळी शिंदे येथे माता रमाई जयंती साजरी

जनसंचलन/ पाडळी

येथील बुद्ध विहारामध्ये ७फेब्रुवारी रोजी त्यागमूर्ती माता रमाई भिमराव आंबेडकर यांची १२६ वि जयंती धुमडक्यात साजरी करण्यात आली. पाडळी शिंदे येथील बुद्ध विहारामध्ये त्यागमूर्ती माता रमाबाई भिमराव आंबेडकर यांची १२६वि जयंती साजरी करण्यात आली यावेळी दिवसभर माता रमाई जयंती निमित्त रेलचेल सुरू होती त्यात सकाळ पासून माता रमाबाई यांना अभिवादन करण्यासाठी दिवसभर महिला पुरुष उपासक उपासिका गावकरी पदाधिकारी यांची उपस्थिती होती सकाळी व सायंकाळी पंचशीला विनोद जाधव यांनी घेऊन येऊन सायंकाळी गावातून मिरवणूक काढण्यात आली होती,त्यानंतर माता रमाई यांच्या फोटोचे पूजन सैनिक राहुल जाधव व त्यांच्या पत्नी किरण जाधव यांनी केले. त्यानंतर खीर पुरी चे जेवण देण्यात आले यावेळी महिला, मुली,यांचा सहभाग मोठ्या संख्येने उपस्थित होत्या तर पुरुष मंडळी युवक वर्ग गावातील पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी तंटामुक्ती अध्यक्ष एकनाथ महाराज शिंदे, सरपंच पती प्रकाश



शिंदे,पोलिस पाटील भारत शिंदे, पत्रकार स्वप्नील शिंदे, रवींद्रबापू शिंदे,दीपक शिंदे, हिम्मतराव शिंदे,गजानन शिंदे, शिवानंद शिंदे,काशिनाथ जाधव,सुर्यनदन जाधव,किशोर जाधव,दुर्योधन घेवंदे,श्रीराम जाधव,संपत जाधव,प्रकाश जाधव,साहेबराव जाधव,चोखोबा मोरे, भिमराव मोरे,रामेश्वर मोरे,गणपत सोनपसारे,संजय खरात, नाना खरात,भारत जाधव ,विजय जाधव,मुरलीधर जाधव,विनोद जाधव,आदी सह उपासक, उपसिका ,मुली,तरुण वर्ग उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भीम टायगर मित्र मंडळाचे बुध्दभुषन जाधव , पंजाब मोरे, संदीप मोरे,कैलास सोनपसारे ,संजय जाधव , प्रमोद जाधव, मनोज मोरे, गणेश खरात,संजय खरात,रामदास मोरे,रमेश मोरे,यांच्या सह इतर उपासक उपसिका यांनी परिश्रम घेतले.

# बुलडाणा अर्बनच्या वतीने मोफत दंतरोग तपासणी आणि औषधोपचार शिबीर...

जनसंचलन/मोताळा

सामाजीक कार्यात नेहमीच सदा अग्रेसर असलेल्या बुलडाणा अर्बन परिवाराचे वतीने परिसरातील नागरीक व संस्थेचे खातेदार सभासद यांचे करिता मोफत दंतरोग तपासणी आणी औषधोपचार शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीराकरिता सुप्रसिध्द डा गायत्री प्रकाश सावजी ह्या तपासणी करणार आहेत. यामधे तपासणी, सल्ला मार्गदर्शन, मोफत औषधी तसेच उपचारावर तिस ते चाळीस टक्के सवलत देण्यात येणार आहे. सदर शिबीर हे परिसरातील खालील शाखा कार्यालयाचे ठिकाणी ९ ते १ यावेळेत ठेवण्यात आले आहे. १२



फेब्रुवारी रोहीणखेड, १३ शेलापूर, १५ कोथळी, १६ मोताळा, २० धामणगाव, २३ पिं देवी, २४ फेब्रुवारी शेंबा तरी परिसरातील नागरीक व संस्थेचे खातेदार सभासद यांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन बुलडाणा अर्बन परिवाराचे वतीने करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय युवा पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन...

जनसंचलन/बुलडाणा

राष्ट्रीय युवा पुरस्कार सन २०२१-२२ साठी ऑनलाईन प्रस्ताव सादर करावे, असे आवाहन क्रीडा विभागातर्फे करण्यात आले आहे. केंद्र शासनातर्फे युवा क्षेत्रामध्ये कार्यरत युवक, युवती आणि संस्थांना राष्ट्रीय युवा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. सन २०२१-२२ या वर्षाकरीता राष्ट्रीय युवा पुरस्काराकरीता प्रस्ताव मागविण्यात आले आहे. यासाठी जिल्ह्यातील युवांनी yas.nic.in या संकेतस्थळावर




ऑनलाईन प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे.

# खामगाव शहरातील फेरीवाल्यांना न्याय मिळावा वंचित बहुजन आघाडीचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

जनसंचलन/ खामगाव

शहराची मुख्य बाजारपेठ ना फेरीवाला संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित केल्याच्या निषेधार्थ फेरीवाले व्यावसायिकासह वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सोमवारी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. खामगाव शहरातील फेरीवाल्यांना न्याय मिळावा या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांच्या नेतृत्वात शांततेत मोर्चा काढण्यात आला. उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, खामगाव शहरात वाहतुकीची समस्या सुरळीत करण्यासाठी प्रत्येक चौफुलीवर पोलिसांची नेमणूक करून ट्राफिक नियंत्रित करता येऊ शकते. परंतु तसे न करता खामगाव नगरपालिकेने ३१ जानेवारी रोजी नागरी पद विक्रेता समितीच्या माध्यमातून गुप्त मीटिंग घेऊन केवळ छोट्या-छोट्या व्यावसायिकांना छळण्याचा सपाटा लावला आहे. शहरातील लहान सहान व्यवसाय करणाऱ्या फेरीवाले यांच्या विषयी शहरातील मुख्य बाजारपेठेच्या ठिकाणी फेरीवाल्यांना व्यवसाय करण्याची बंदी करण्याचा ठराव घेण्यात आला. सदर फेरीवाल्यांचे ८६५ रजिस्टर्ड सभासद आहेत. शासनाच्या पीएम स्वनिधी व मुद्रा लोन योजनेअंतर्गत



फेरीवाल्यावर बँकांचे कर्ज आहे. सभासदांना कोणतेही पूर्वसूचना न देता किंवा लाऊडस्पीकर द्वारे शहरातील फेरीवाल्यांना सुचित न करता खामगाव शहरातील मुख्य चौकामध्ये ना फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करून त्यांच्या परिवाराच्या पोटावर लाथ मारण्याचे काम नगरपालिकेने केले आहे, ही बाब निषेधार्थ आहे. या संदर्भात नगरपालिका मुख्याधिकारी यांना २ फेब्रुवारी व ५ फेब्रुवारी रोजी प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन देण्याकरिता गेले असता मुख्याधिकारी गैरहजर होते. त्यामुळे सदरचा मोर्चा उपविभागीय अधिकारी कार्यालयावर गेला व तेथे उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी यांच्याशी चर्चा करत त्यांना अन्यायकारक ठरावाबाबत फेरीवाल्यांच्या समस्या सांगून खामगाव शहरातील फेरीवाल्यांना न्याय मिळावा अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांनी केली. यावेळी तालुकाअध्यक्ष प्रभाकर वरखेडे, बाजार समिती उपसभापती संघपाल जाधव, वाहिद जामा, प्रकाश दांडगे, नितीन सूर्यवंशी, रमेश गवारगुरु, आनंद नागे, शब्बीर भाई , समीर खान, शेख करीम शेख रहीम, सुभेदार खान दिलदार खान, दीपक जैन, पुरुषोत्तम मेसरे, शेख नसीर शेख निसार, मोहम्मद इरफान अ. सलाम, मुकेश केळोदे, नितीन नथ्थानी, शेख जावेद शेख हुसेन यांच्यासह २०० ते ३०० फेरीवाले व्यावसायिक उपस्थित होते.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भाजपला खरे राम कळलेच नाहीत, रामाचे खरे अनुयायी उद्धव ठाकरेच, सुषमा अंधारेंचं वक्तव्य...

**वृत्तसंस्था/ परभणी**

आम्ही राम भक्त आहोत, असा भाजपने आव आणण्याचा प्रयत्न केला. पण मुळामध्ये भाजपला राम कळालेलाच नाही. राम एकपत्नी होते. राम एकवचनी होते आणि राम एकबानी होते. रामाचे खरे अनुयायी उद्धव ठाकरेच आहेत. भाजपला खरे राम कळलेच नाहीत, अशी टीका सुषमा अंधारे यांनी केली.मातृ तीर्थ ते शिवतीर्थ अभियानांतर्गत सुषमा अंधारे आज परभणीत आल्या होत्या. येथे महिला शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर जिल्हाप्रमुख विशाल कदम अतुल सरोदे अंबिका डहाळे हे प्रमुख उपस्थित होते. पुढे बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या की, ७०,००० कोटीच्या घोटाळ्याचा आरोप मोदीजी महाराष्ट्रामध्ये येऊन करतात. त्यानंतर ७२ तासात उलटल्यानंतर ज्यांच्यावर आरोप केले त्यांना सत्तेत घेऊन बसतात. जे फडणवीस राष्ट्रवादीला सत्तेमध्ये घेणार नाही नाही नाही अशा घोषणा करत होते, तेच फडणवीस राष्ट्रवादीसोबत जाऊन पहाटे दुपारी संध्याकाळी असे शपथविधी घेत आहेत. त्यामुळे यांना एकवचनीपणा देखील कळाला नाही.अंधारे म्हणाल्या की, तसेच राम एकपत्नी होते. पण भाजप आणि शिवसेनेकडे पाहिल्यावर असे वाटत नाही की ते आणि त्यांचे प्रमुख पदाधिकारी एकपत्नी आहेत. राहुल शेवाळे, संजय राठोड, हेमंत गोडसे यांचे व्हिडिओ पाहिल्यानंतर यांना एकवचनी म्हणावेच कसे हा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे श्रीरामाचे खरे अनुयायी उद्धव ठाकरे शोभतात. जसे रामाशी राजकारण करून रामाचा राजपाट काढून घेतला. रामाला वनवासाला तसेच उद्धव ठाकरे यांच्याशी राजकारण करून राहुल नार्वेकरसारख्या दहा पक्ष फिरून आलेल्यांना हाताशी धरून उद्धव ठाकरे यांचा पक्ष काढून घेतला. ज्याला निष्ठा माहित नाही ते राहुल नार्वेकर आज सांगत आहे की, शिवसेना यांची राष्ट्रवादी त्यांची असे लोकांना सांगत आहे. या सर्वांनी कपटनीतीने उद्धव ठाकरेंचा



राजपाट हिसकावून घेतला. हा राजपाट हिसकावून घेण्यासाठी भाजपने ईडी, सीबीआय यासारख्या स्वायत्त संस्थांचा देखील वापर केला. उद्धव ठाकरेंना राजकीय वनवास कसा भोगता येईल, याची तरतूद केली, अशी टीका सुषमा अंधारे यांनी केली आहे.

## मुख्यमंत्री मा.ना.एकनाथजी शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त ६० किलोचा मोदक श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणेशास अर्पण.

**वृत्तसंस्था/पुणे**



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.ना.एकनाथजी शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या वतीने ६० किलोचा मोदक श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणेशास अर्पण करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री मा.एकनाथजी शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त विधानपरिषदच्या उपसभापती तथा शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांच्यावतीने श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणेश मंदिर येथे ६० किलो वजनाचा मोदक अर्पण करण्यात आला.शिवसेना पुणे शहर व जिल्ह्याच्या वतीने नीलम गोऱ्हेंच्या व अन्य पदाधिकारी यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. या प्रसंगी शिवसेना नेत्या व विधानपरिषद उपसभापती ना.डॉ.नीलमताई गोऱ्हे यांच्या समवेत शिवसेना पुणे शहर प्रमुख प्रमोदनाना भानगिरे, जिल्हा प्रमुख रमेश कोंडे, शिवसेना कामगार सेना अध्यक्ष सुधीर कुरुमकर, शिवसेना महिला आघाडीच्या पूजा रावेतकर, सुदर्शना त्रिगुणाईत आदी मान्यवरांच्या बरोबरच शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते. या नंतर डॉ.नीलमताई गोऱ्हे ,प्रमोदनाना भानगिरे, रमेश कोंडे व पदाधिकारी यांनी दगडूशेठ हलवाई दत्त मंदिरात दर्शन घेवून महाआरती केली. या प्रसंगी प्रसार माध्यमांशी बोलतांना डॉ.नीलमताई गोऱ्हे म्हणाल्या, महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे या कार्यसम्राट मुख्यमंत्र्यांचा वाढदिवस विविध समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणेशास महाआरती करून आगामी काळात येणाऱ्या निवडणुकांच्या मध्ये शिवसेना भाजप राष्ट्रवादी आघाडीस यश मिळावे त्यांचे जास्तीजास्त खासदार, आमदार निवडून यावेत व पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे केंद्रात तर मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात राज्यात सरकार स्थापन होवो अशी प्रार्थना केल्याचे सांगितले. तसेच येथे केलेल्या बहुसंख्य प्रार्थनां परमेश्वराचे आशीर्वादाने सफल केल्याचे त्यांनी नमूद केले. या महाआरतीच्या वेळी मिळालेले श्रीफल ९ फेब्रुवारी या तारखेस वाढदिवसाच्या दिवशी ना. एकनाथ शिंदे यांना अर्पण करण्यात येणार आहे

## जिल्ह्यात महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढले बलात्काराचे १०२ प्रकरणे दाखल

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यामध्ये महिलांवर अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र असून २०२३ मध्ये बलात्काराच्या १०२ घटना घडल्या होत्या. दरम्यान यातील १०१ प्रकरणाचा पोलिसांनी छडा लावून आरोपीवर कारवाई केली आहे. दुसरीकडे विनयभंगाची प्रकरणेही जिल्ह्यात वाढत असल्याचे चित्र आहे. २०२३ मध्ये पोलीस दप्तरी तब्बल ३८० गुन्हे हे महिलांचा विनयभंग केल्याप्रकरणात दाखल झाले होते. यातील ३७५ गुन्ह्यांमध्ये आरोपींना अटक करुन कारवाई करण्यात आली होती. या एकंदरीत घटना पाहता जिल्ह्यात महिलांवर अत्याचाराचे प्रमाण वाढत असल्याचे एकंदरीत चित्र आहे. २०२४ मध्येही महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. दुसरीकडे महिलांवरील अत्याचारावर प्रतिबंध घालण्यासाठी पोलिस प्रशासन गंभीर असल्याचेही दिसते. यासोबतच महिलांसंदर्भात कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळासह तत्सम त्रासासंदर्भानेही शासकीय तसेच खाजगी कार्यालयामध्ये अंतर्गत तक्रार निवारण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. मात्र, २५९ खाज-



गी कार्यालयांमध्ये अशा समित्या गठीत करण्यात आलेल्या नाही. त्यासंदर्भाने महिला आयोगाने मध्यंतरी सविस्तर अहवाल मागविला होता.

## गळफास घेऊन विवाहितेची आत्महत्या....

**जनसंचलन/बुलढाणा**

एका २५ वर्षीय विवाहितेने ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन जीवनयात्रा संपविल्याची घटना माळेगाव येथे २ फेब्रुवारी रोजी साडेबारा वाजेच्या सुमारास उघडकीस आली. पूजा आकाश बरडे असे मृत महिलेचे नाव आहे. तालुक्यातील माळेगाव येथील पूजा आकाश बरडे या २५ वर्षीय विवाहितेने २ फेब्रुवारी रोजी साडेबारा वाजेच्या सुमारास घरामागील मालोच्याला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतला होता. यावेळी नातेवाइकांनी



तिला तत्काळ उपचारासाठी बुलढाणा येथील सामान्य रुग्णालयात हलविले असता त्याठिकाणी डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. दरम्यान, बुलढाणा येथे शून्यमध्ये प्रकरण दाखल करण्यात आले होते. ८ फेब्रुवारी रोजी बोराखेडी पोलिसात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पीएसआय विजयकुमार घुले आणि सुनील थोरात करत आहे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958